MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२६ | मंगळवार दि.२१ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -126 | TUESDAY DT.21 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## चकलांबा पोलिसांनी कोळगावात अवैध दारूसाठा केला जप्त



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील मौजे कोळगाव येथे होत असलेल्या अवैध दारू अड्ड्यावर छापा टाकून गोंदी पोलीसांनी ९ हजार ८०० रुपये किमतीच्या देशी दारूच्या बॉटल जप्त केल्या आहेत. अवैध देशी दारू विक्रीची माहिती मिळताच बीट जमादार पो.ह विश्वनाथ प्रधान यांनी कोळगाव येथे कारवाई करत देशी दारूच्या बॉटल जप्त केल्या आहेत. याप्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चकलांबा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अजय पानपाटील हे करत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पाटील, पो. जमादार कैलास खटाणे, पो. जमादार विश्वनाथ प्रधान यांनी केली. या कारवाईमुळे कोळगाव येथील अवैध दारू विक्रीत्यांचे धाबे दणाणले आहे.

# माझे आरोप हवेतील नव्हते

## CCTV वरून सुरेश धस यांचा वाल्मीक कराडवर निशाणा, दीड वर्षांपूर्वीच्या महादेव मुंडेंच्या खूनावरही भाष्य

बीड / प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी निगडीत खंडणी प्रकरणाचा एक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. आज समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून आकाचा या प्रकरणात संबंध आहे, हे स्पष्ट होत असल्याचे सुरेश धस यांनी म्हटले आहे. माझे आरोप हवेतील नव्हते. मी जे बोललो त्याला पुष्टी मिळाली आहे, असेही ते म्हणाले. तसेच यावेळी बोलताना दीड वर्षांपूर्वी परळीत झालेल्या एका खुनाचा दाखला देत धस यांनी सवाल उपस्थित केले आहेत. महादेव दत्तात्रय मुंडे खून प्रकरण दाबण्यासाठी आका आणि इतर सहकाऱ्यांनी पोलिसांवर दबाव आणला होता, असा गौप्यस्फोटही धस यांनी केला.

आवाद कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे ज्या दिवशी खंडणी मागितली, त्या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत. या सीसीटीव्हीमध्ये संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपी एकत्र दिसत आहेत. विशेष म्हणजे देशमुख हत्या प्रकरणामुळे निलंबित झालेले पीएसआय पाटील देखील त्यांच्यासोबत असल्याचे फुटेजमध्ये दिसत आहेत. यावरून आता विरोधकांकडून टीकास्त्र सोडले जात आहे. सुरेश धस यांनीही या सीसीटीव्ही फुटेजवर प्रतिक्रिया देताना अनेक खुलासे केले आहेत.

**काय म्हणाले सुरेश धस?**

आज समोर आलेल्या सीसीटीव्हीमध्ये आका, चाटे, घुले हे आहेत हे स्पष्ट दिसत आहेत. माझे आरोप हवेतील नव्हते. या लोकांचा खंडणी, हत्येशी आकाचा संबंध आहे, यातून हे सिद्ध होत आहे. आवादा कंपनींच्या शिंदेंना २९ नोव्हेंबरला गाडीत घालून पाथर्डीपर्यंत नेलं होतं. तिथून मारत मारत येथे आणलं, त्यानंतर त्याला सोडून दिले. त्याचे हे सीसीटीव्ही फुटेज आहे. त्यामुळे १०१ टक्के आका, विष्णू चाटे, सुरेश आंधळे हे आरोपी आहेत, असा आरोप सुरेश धस यांनी केला.

**खून प्रकरणात नववा आरोपी टाकला पाहिजे**

याप्रकरणात पीआय पाटील याला सहआरोपी केले पाहिजे तसेच महाजन आणि गर्जेंना बडतर्फ केले पाहिजे किंवा गडचिरोलीला पाठवले पाहिजे. असे सुरेश धस म्हणाले. संतोष देशमुख हत्याप्रकरणात आत्तापर्यंत ७-८ आरोपी झाले आहेत, आता नववा देखील टाकला पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

**तो मी नव्हेच म्हणणारा, हा मी आहेच**


जे गुन्हा करतात ते तो मी नव्हेच असे म्हणतात. पण आता हा मी आहेच हे दिसत आहे. मी जे म्हणालो होतो त्याला पुष्टी मिळाली आहे. हे आरोपी खरे आहेत. अजूनही बरेच आरोपी आहेत, हे सोटमुळे सापडली आहेत. अजून आंगतुक मुळे आहेत. आंगतुक मुळे अजून राहिली आहेत, त्यांचाही बंदोबस्त व्हावा, अशी आमची मागणी आहे. त्यांची रितसर नावे एसआयटीला देऊ, असेही धस म्हणाले.

**२२ ऑक्टोबरला दत्तात्रय मुंडेंचा परळीत खून**

सुरेश धस यांनी यावेळी बोलताना परळीतील दीड वर्षांपूर्वीच्या खुनाच्या घटनेवरही भाष्य करत अनेक सवाल उपस्थित केले आहेत. कन्हेरवाडी येथील महादेव दत्तात्रय मुंडे याचा २२ ऑक्टोबर २०२३ रोजी खून झाला. परळी वैजनाथच्या तहसीलसमोर हा खून झाला. परळी पोलिस स्टेशनला सानप नावाचे पीआय होते, त्यांनी या घटनेचा छडा लावत आरोपीही शोधून काढले. मात्र, आरोपींना अटक करायची नाही. त्यांऐवजी राजाभाऊ फड आणि इतर आरोपी अटक करा, असे आका आणि आणखी कोणीतरी सांगितले. पीआय सानप प्रामाणिक अधिकारी होते त्यांनी तसे करण्यास नकार दिला. आता त्यांची धाराशीव जिल्ह्यात बदली झाली आहे, असा दावा सुरेध धस यांनी केला. विशेष म्हणजे या हत्या प्रकरणातील सहाचे ६ आरोपी हे आकाच्या इर्द गिर्दी भटकताना दिसतात, असे सांगत सुरेश धस यांनी वाल्मीक कराडवर हल्लाबोल केला.

आतापर्यंतही महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या खुनाचा तपास लागला नाही. मुंडे यांच्या खूनाचे आरोपी परळीतच हिंडतात, असा दावा सुरेश धस यांनी केला. महादेव मुंडे हे सतीश फडचे मेव्हणे आहेत. सतीश फड पूर्वी पंकजा मुंडेंकडे होता. आता तो धनंजय मुंडेकडे गेला आहे. त्याच्या मेव्हण्याचा हा मृत्यू झाला. मात्र, अद्याप या हत्येचा तपास लागलेला नाही, असा गौप्यस्फोट धस यांनी केला.





### हत्येच्या दिवशी आरोपींची फोनाफोनी

संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई झाली आहे. सर्व आरोपी आता कोठडीमध्ये असून या प्रकरणाचा एसआयटी तपास करत आहे. कृष्णा आंधळे हा एकमेव आरोपी अद्याप फरार आहे. संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यादिवशी विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि वाल्मीक कराड यांच्यात फोनवर संभाषण झाल्याचा दावा पोलिसांनी कोर्टात केला होता. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि आरोपींची फोनाफोनीची वेळ मिळतीजुळती असल्याचेही पोलिसांनी कोर्टात म्हटले होते. दरम्यान, आता वाल्मीक कराडविरोधात पोलिसांना ठोस पुरावा मिळाल्याने कारवाईला वेग येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### २९ नोव्हेंबरला वाल्मीक कराड केज शहरात

वाल्मिक कराड याने विष्णू चाटेटेच्या मोबाईलवरून आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा व्हिडिओ महत्त्वाचा समजला जात आहे. २९ नोव्हेंबर २०२४ रोजीचा सकाळी अकरा वाजताचा हा व्हिडिओ आहे. यानंतर आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याचा प्रकार घडला असल्याचा संशय आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मीक कराड केज शहरात होता, याचा हा पुरावा देखील आहे. खंडणी आणि हत्या प्रकरणातील काही आरोपी यामध्ये दिसत आहेत. त्यामुळे वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे.

---

## बाहेर गावाहून हातभट्टी दारूची होम डिलिव्हरी होतेच कशी; होम डिलिव्हरी करणारा तो कोण? बीट अंमलदार फक्त नावालाच कारवाई शुन्य; चौकशी करून उचलबांगडी होणे गरजेचे?


# कुंभेजळगाव परिसरातील तांड्यावर हातभट्टी दारु विक्री जोमात, पोलिसांची कारवाई कोमात!

## पोलिसांच्या आशीर्वादाने मोटारसायकल वरून हातभट्टी दारूची होम डिलिव्हरी?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कुंभेजळगाव तांड्यावर देशी-विदेशी दारूचे प्रमाण कमी होत चालले असले तरी हातभट्टी दारूचे अड्डे मात्र खुलेआम सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीर हातभट्टी दारूचे अड्डे थाटले असून, हातभट्टी दारूची मोठ्या प्रमाणात विक्री केली जात आहे. तसेच बाहेर गावाहून हातभट्टी दारूची 'होम डिलिव्हरी' केली जात आहे. यासाठी मोबाईलवर 'ऑर्डर' घेतली जात असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.
कुंभेजळगाव परिसरातील तांड्यावर अवैध हातभट्टी दारू विक्री जोमात तर पोलिस प्रशासनाची कारवाई कोमात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.
बेकायदेशील व्यवसाय करणाऱ्या लोकांना पोलीस प्रशासनाच्या खाकीचा दाख राहिला नसल्याने खुलेआम दारूचे अड्डे झपाट्याने वाढत आहेत. चकलांबा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक व बीट अंमलदार यांना बेकायदेशीर हातभट्टी दारू विक्रीची माहिती असूनही कारवाई का केली जात नाही? असा मोठा प्रश्न कुंभेजळगाव परिसरातील सामान्य नागरिकांना पडत आहे. अनेक ठिकाणी घराघरात हातभट्टी दारूची विक्री केली जात आहे. पहाटेपासून दारू पिणारे खूप तळीराम आहेत. देशी दारूच्या दरातील वाढीमुळे अनेक तळीरामांनी हातभट्टी दारू पिण्याचे सुरू केले आहे. त्यामुळे हातभट्टीला मागणी वाढली आहे. यामुळे हातभट्टी दारूच्या विक्रीत खूप वाढ झाली आहे. कुंभेजळगाव परिसरात हातभट्टी दारू विक्रीची वाटचाल पाहून पोलिसांचे सुगीचे दिवस चालू असतील अशी चर्चा परिसरात चालू आहे. संबंधित बीट अंमलदार यांनी बेकायदेशीर दारू विक्रेत्यांना दारू विक्री करण्याची परवानगी दिली की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कुंभेजळगाव परिसरातील





तांड्यावर बाहेर गावाहून मोटारसायकल वरून हातभट्टी दारूची होम डिलिव्हरी होतेच कशी? याची चौकशी होणे गरजेचे आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी बीट अंमलदार कोण आहेत. यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### हातभट्टी दारू विक्रेत्यांकडून जीवाशी खेळ; आरोग्यास घातक

हातभट्टी दारू तयार करण्यासाठी बाभळीची साल, नवसागर, गूळ काही केमिकलचे घटक व अत्यंत अशुद्ध पाण्याचा वापर केला जातो. शरीराला घातक असणार्या या दारूने आजपर्यंत अनेक लोक बळी गेले आहेत. तरीही हातभट्टी दारू विक्रेत्यांकडून जीवाशी खेळ सुरूच आहे. आजपर्यंत दारूमुळे अनेकांनी आपला जीव धोक्यात घालून जीव गमावला आहे. यामुळे या परिसरातील हातभट्टी दारूचे अड्डे उद्धवस्त करून कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# समाजकल्याण विभागामध्ये २ कोटींचे नियमबाह्य काम थांबवली

## जिल्हाधिकारी बीड यांनी दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करा - अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

समाज कल्याण विभागामध्ये अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत २ कोटीचे कामे सुरू आहेत याची माहिती अधिकारातून समाजकल्याण विभागातून प्राप्त केल्यानंतर सर्व पडताळणी केली असता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई यांचा शासन निर्णय दिनांक २२ मार्च २०१७ मधील नियम-अटीचे उल्लंघन करत असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष यांनी सदरील काम थांबविले आहे.

समाज कल्याण विभागामध्ये ६० लक्ष रुपये खर्च करत सीसीटीव्ही बसविणे, १० लक्ष रुपये खर्च करत सोलार हायमास्ट यंत्रणा बसविणे, तसेच सामाजिक न्याय भवन बीड अंतर्गत समाज कल्याण कार्यालयामध्ये एकूण ७ कामे ३० लक्ष रुपये खर्च करून सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविणे बाबत काम सुरू आहे. केंद्र शासनाची पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजना राबविली जात असून सर्व शासकीय कार्यालयाच्या छतावर रूफटॉप सोलार संच उभारण्यात येणार आहे. सदरील योजना प्रकल्प कार्यकारी अधिकारी महाऊर्जा बीड यांचे कडून राबविण्यात येणार आहे या योजनेमध्ये कसलेही नाविन्यपूर्ण-वैशिष्ट्यपूर्ण नसून गुत्तेदारांना पोसण्याचे काम या माध्यमातून होताना दिसून येत आहे परंतु सदरील कामे अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत ३% निधी नाविन्यपूर्ण-वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्यासाठी खर्च केला जातो त्यामध्ये कार्यालयावर खर्च करता येत नाही तसेच वरील कामांमध्ये कोणतेही नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण दिसून येत



नाही त्यामुळे सदरील निधी हा शासन निर्णयाच्या उल्लंघन करत खर्च केला जात असल्याची निदर्शनास आले आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार देत सदर प्रकरणी चौकशी करावी अशी ही विनंती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी बीड यांनी प्रशासकीय मान्यता देताना खातरजमा करावी

अनुसूचित जातीच्या योजनेच्या निधीचा गैरवापर होणार नाही ही दक्षता घेत असून माहिती अधिकारातून पुन्हा एकदा समाज कल्याण बीड येथील घोटाळा होण्याअगोदर बाहेर निघाला आहे याबाबतची पुरावे संबंधित अधिकारी यांना पाठविण्यात आले असून लवकरच चौकशी समिती गठीत होईल. जिल्हा नियोजन समितीतील अधिकारी शासन निर्णयाचे उल्लंघन होते किंवा नाही याची खातरजमा न करता प्रशासकीय मान्यता देत आहेत सदर प्रकरणी यांची सखोल चौकशी होणे महत्त्वाचे आहे दिलेली प्रशासकीय मान्यता तात्काळ रद्द करावी अशी मागणी केली आहे.

या अगोदर अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्यासाठी तीन टक्के निधी राखीव ठेवला जातो यामध्ये तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांनीही नियमबाह्य खरेदी केली होती यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी तक्रार दिली होती तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी झाली व सदर प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन होत असल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. पुन्हा तोच प्रकार २०२४-२५ मध्ये आढळून येत आहे सदरील कामे पूर्ण होणे अगोदरच थांबविण्यात आलेली आहेत.



वार्ड क्रमांक २५ चे फिक्स नगरसेवक तनवीर बागवान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पत्रकार उत्तम ओव्हाळ सलमान मोमीन लक्ष्मण वंजारे सलमान बागवान धनंजय आगलावे व इतर

# उमेद बीड मिनी सरस प्रदर्शनाचा उत्साहात समारोप

बीड । प्रतिनिधी

दिनांक १६ /०१/२०२५ ते २०/०१/२०२५ या पाच दिवसापासून छत्रपती संभाजी महाराज मैदानात सुरू असलेल्या सरस प्रदर्शन व विक्रीचा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री आदित्य जीवने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक मा. श्रीमती संगीतादेवी पाटील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री वासुदेव सोळंके यांच्या उपस्थितीत उत्साहात समारोप करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर जि.ग्रा.वि.यंत्रणा विस्तार अधिकारी श्री वैभव जाधव , उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत इ.उपस्थित होते.

जिल्हा परिषद , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड व उमेद द्वारा आयोजित बीड मिनी सरस प्रदर्शन व विक्री मध्ये तब्बल विक्रमी २५ लक्ष ४७ हजार रुपयाची उमेद गटातील महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू , मसाले , शोभेच्या वस्तु , खाद्यपदार्थांची विक्री करण्यात आली.

समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी सांगितले की सदरील सरस यशस्वी होण्यामागे केवळ या पाच दिवसातील महिलांची मेहनत नाही तर वर्षातील ३६५ दिवस महिलांनी मेहनत घेतली आहे तेव्हा हे सर्व यशस्वीपणे या ठिकाणी पार पडले आहे. सरस मध्ये महिलांनी आणलेल्या अनेक उत्पादनाचे पॅकिंग व ब्रँडिंग अतिशय उत्कृष्ट पद्धतीचे होते तसेच उमेदच्या इतर उद्योजक महिलांनाही यापुढे उत्पादनाच्या पॅकेजिंग व ब्रँडिंग चे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच सर्व प्रदर्शनामध्ये डिजिटल ऑनलाइन पेमेंट चा वापर मोठ्या प्रमाणात केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी महिलांचे भरभरून कौतुक केले. तसेच याप्रसंगी प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील यांनी आपल्या मनोगतातून महिलांचे कौतुक करून बीड मिनी सरस प्रदर्शनाच्या



यशस्वीतेसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी विविध विभाग प्रमुख नगरपरिषद , जिल्हाधिकारी कार्यालय , अग्नीशमन विभाग , पोलीस प्रशासन इत्यादी बद्दल कृतज्ञता व्यक्त करून प्रदर्शनाची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी केल्याबद्दल उपस्थित सर्व पत्रकार बंधूंचे महिलांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन आभार व्यक्त केले. सरस प्रदर्शन विक्री अहवाल व अनुभव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे विस्तार अधिकारी श्री वैभव जाधव यांनी सादर करून कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख यांनी तर सूत्रसंचालन तालुका अभियान व्यवस्थापक श्रीमती रश्मी गोसावी यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा व्यवस्थापक आशा पवार यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वासुदेव सोळंके व उमेद चे जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत उपस्थित होते.

बीड मिनी सरस प्रदर्शन समारोप कार्यक्रमात रेगुलर सर्वसाधारण गटातून उत्कृष्ट गट म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील संत जनाबाई गट , उत्कृष्ट मांसाहारी खाद्यपदार्थ गट आष्टी तालुक्यातील स्टार गट तर उत्कृष्ट शाकाहारी खाद्यपदार्थ गट श्री साई गट गोविंदवाडी, यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले सदरील विक्री व प्रदर्शनात एकूण ११६ गटांचे स्टॉल लावण्यात आले होते सदर स्टॉल मधून पाच दिवसात विक्रमी २५.४७ दक्ष रुपये ची विक्री करण्यात आली.

बीड मिनी सरस प्रदर्शनाला बीड शहरातील नागरिक विशेषतः महिला तसेच जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता गटांचे पदाधिकारी कॅडर यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. समारोप कार्यक्रमात स्टालधारक महिलांनी वर्षभरात अशाच अनेक प्रदर्शनाचे आयोजन करण्याची अपेक्षा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे व्यक्त केली . मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांनी महिलांची ही अपेक्षा तात्काळ पूर्ण करताना , अशा प्रकारचे वर्षभरात किमान तीन ते चार प्रदर्शन आयोजित करण्याचा मनोदय आपल्या भाषणातून व्यक्त केला.

# नेकनूर येथे मोफत आरोग्य शिबिर संपन्न

नेकनूर । प्रतिनिधी

लोककल्याण आरोग्य केंद्र मुंबई व बीड जिल्हा शिवसेना यांच्या वतीने नेकनूर येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी,नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व मोफत औषधोपचार होत असल्याने नागरिकांनी या शिबिराला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.दैनंदीन धावपळीत आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी सामान्य माणसांना वेळ नसतो.सगळ्याच आरोग्य तपासणी एका ठिकाणी होत नाहीत आणि यासाठी मोठ्या प्रमाणात पैसै खर्च करावे लागतात म्हणूनच शिवसेना बीड जिल्हा यांच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.मोफत भव्य आरोग्य शिबीराचे २०० जणांची मोफत तपासणी करण्यात आली.भव्य मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन श्री गुरु बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या हस्ते झाले.यावेळी शिवसेना बीड



जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर,शिवसेना जिल्हासंघटक योगेश नवले, युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे,मा.जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र फुटाणे गुरूजी, नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे, नेकनूर चे ग्रामपंचायत सदस्य मुकुंद काळे,बबलू सय्यद, जयदीप काळे, विलास राऊत, जितेंद्र होमकर, चंद्रकांत शिंदे, नामदेव काळे,सुंदर शिंदे,मधुकर काळे,संजय शिंदे, धर्मराज काळे सर,बाजीराव काळे,बबन लोंढे,शिवाजी शिंदे,नवनाथ शिंदे,दत्ता शिंदे,भारत शिंदे,गोपीनाथ जाधव, राजाभाऊ ढवळशंख व इतर मान्यवर उपस्थित होते.

# वडवणी येथील नागरिकांनी प्रधानमंत्री आवास घरकूल योजना (शहरी) २ चा लाभ घ्यावा

## नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप यांचे आवाहन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांसाठी आनंदाची बा उच्चब म्हणजे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता नोंदणी सुरु झालेली असून तरी इच्छूक लाभार्थ्यांनी वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी तसेच त्या सर्व कागदपत्रांची एक प्रत नगरपंचायत कार्यालयामध्ये जमा करावी असे आवाहन वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री आवास योजनेमुळे गोरगरीब व सर्वसामान्यांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. वडवणी शहरामध्ये प्रधानमंत्री आवास योजना आवास योजना टप्पा क्रमांक एकमुळे हजारो गोरगरिबांचे आपले स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झालेले आहे. आता उर्वरित रहिवाशांना हे आपल्या स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे. याकरिता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता वेब पोर्टलवर इच्छूक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी. यासाठी आवश्यक पात्रता यामध्ये भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, कुटुंबातील वार्षिक उत्पन्न



मर्यादा ३ लक्ष रुपये कमाल राहील. अशी यासाठी पात्रता असून नविन घरकूल नोंदणी ऑनलाईन करण्याकरिता खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत. यामध्ये विहित नमुन्यातील ऑनलाईन भरलेला अर्ज, अर्जदाराचे मोबाईल नंबर लिंक असलेले आधार कार्ड, तहसीलदार यांचेकडील चालू वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक, पी.टी.आर रजिस्ट्री सातबारा हे जमिनीचे पुरावे, अर्जदार यांचे आई वडिलांचे आधार कार्ड तसेच जर ते हयात नसतील तर मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदार यांचे कुटुंबामधील सर्व सदस्यांचे जसे की पती-पत्नी व मुले यांचे आधार कार्ड, पी.एस.स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम.विश्वकर्मा इत्यादी योजनेचे लाभार्थी असल्यास नोंदणी क्रमांकाची प्रत आवश्यक आहे, भारत देशात कोठेही पक्के घर नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व सद्यस्थितीतील घराचा फोटो अशाप्रकारे वरील संपूर्ण कागदपत्रांच्या मुळ प्रतींसह ऑनलाईन नोंदणी करावी व संपूर्ण कागदपत्रांची एक प्रत नगरपंचायत वडवणी कार्यालयात जमा करावी. अशा प्रकारे वडवणी नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांनी या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ या घरकूल योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,मुख्याधिकारी पोपट निगळ यांसह सर्व सभापती, नगरसेवक यांनी केले

# एचआयव्हीची अफेमुळे संपूर्ण कुटुंबाला वाळीत टाकल्याचा धक्कादायक प्रकार

## बीड मधील आष्टी तालुक्यातील घटना

आष्टी । प्रतिनिधी

एच आय व्ही च्या अफेमुळे संपूर्ण कुटुंबाला वाळीत टाकल्याचा प्रकार आष्टी तालुक्यात समोर आला आहे ही अफवा पसरण्यात आरोग्य विभागाने पोलिसांची हात असल्याचा आरोप कुटुंबाने केला आहे पोटचा गोळा गेल्याचे दुःख पचत नाही तोच गावाने वाळी टाकल्यामुळे हे कुटुंब हतबल झाले आहे मुलीचा एच आय व्ही मुळे मृत्यू झाल्याची खोटी माहिती पोलिसांनी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितल्यामुळे कुटुंबाची समाजात बदनामी झाली तसेच गावातील लोकांनी आम्हाला वाळीत टाकले आमच्या सोबत व्यवहारही थांबवले आहेत अशी आपभिती पीडित कुटुंबाने सांगितले या आरोपामुळे घरातल्या महिलेने दोन वेळा जीवन संपवण्याचा प्रयत्न केला असा दावाही कुटुंबीयांनी केला आहे

आमची मुलगी गेली पण जवळचे लोकही भेटायला आले नाहीत ह्या अफेमुळे कोणीही आमच्या जवळ येत नाही आरोग्य विभागाने खोटा अहवाल दिला सासरच्या मंडळीच्या सांगण्यावरून हे झाले आम्हाला न्याय द्या अशी मागणी कुटुंबांनी केली आहे पीडित कुटुंबाची डॉक्टर पोलीस विरोधात तक्रार पीडित कुटुंबाने डॉक्टर आणि पोलीस कर्मचाऱ्यांची विरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे एक ऑडिओ क्लिपही आहे त्यांनी दाखवली हे क्लिप पोलीस कर्मचाऱ्यांची असल्याची पिडीत कुटुंबाचे म्हणणे आहे तुमच्या मुलीला एच आय व्ही होता त्याची तपासणी करून घ्या असे या क्लिप मधील व्यक्ती म्हणत आहे

काय म्हणाले अधिकारी

१) आष्टी येथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुरेश ढाकणे म्हणाले असा प्रकार मी सांगितलं नाही २) जे कारण डॉक्टरांनी सांगितले तेच मी त्यांच्या नातेवाईकांना सांगितली दुसरा काही विषय नसून मी मनाने कशासाठी सांगेल असे पोलीस हवालदार बबुशा काळे यांनी सांगितले

# टाटा इंडिको मध्ये सापडला गुटखा; तलवाडा पोलिसांची कारवाई

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : बीड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आल्यापासून अवैध धंद्याला मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यावर कारवाईचा धुमधडाका सुरू आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तलवाडा येथे एका गुटखा माफीया यांच्या टाटा इंडिगो कंपनीच्या गाडी मध्ये विविध कंपनीचे गुटखा जर्दा गाडी मध्ये असल्याची तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि सोमनाथ नरके यांना गोपीनिय माहिती मिळताच दिं.२०/१/२०२५ रोजी पाच वाजता सपोनि सोमनाथ नरके,**

सह पोलिसांचा फौज फाटा घेऊन तलवाडा येथील गणेश नगर येथे स्पोर्टला पोहोचले व गाडी जप्त करुन टाटा इंडिको कंपनीची क्रमांक चक २१ त५००१गाडीला टोचन करून तलवाडा पोलीस ठाण्यात आल्यानंतर गाडीत विविध कंपनीचा गुटखा जर्दा



दोन लाख ३३ हजाराचा मुद्देमाल जप्त

आढळला आहे. या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशनचे बीट अंमलदार नारायण काकडे यांच्या फिर्यादीवरून कलम २७४,२७५, १२३ ,प्रमाणे भारतीय न्याय दंड संहिता प्रमाणे शेख सद्दाम मुसा रा,तलवाडा तालुका गेवराई यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण मुद्देमाल दोन लाख ३३ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सपोनि सोमनाथ नरके, यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास उपनिरीक्षक स्वप्निल कोळी करीत आहे.

# बीड जिल्ह्यात ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस

## बोगस फळबाग पीक विमा प्रकरणी चौकशी सुरू पण खरंच कारवाई होईल का?
## जिल्हाप्रशासनाचे गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांना पत्र :- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील मृग बहार २०२४ योजनेंतर्गत बोगस फळबाग पिक विमा प्रकरणात शासनाची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करणाऱ्या बीड जिल्ह्यातील संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केल्यानंतर त्या निवेदनाच्या अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसीलदार महसूल -१ अविनाश शिंगटे यांनी महाराष्ट्र शासन गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांना संदर्भीय निवेदनाची प्रत उचित कार्यवाहीस्तव पाठवली असुन खरंच संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत की नेहमीप्रमाणेच हा सुद्धा चौकशीचा फार्स ठरणार आहे अशी शंका डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केली आहे.



प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२४ व पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२४ मधील विमा संरक्षित क्षेत्राची कृषी आयुक्तालयातील पथकांमार्फत क्षेत्रीय पडताळणी करण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले होते.त्या अनुषंगाने १६ ते १८ आक्टोबर २०२४ या कालावधीत बीडसह ईतर जिल्ह्यातील निवडक तालुक्यात विमा सहभागी शेतकऱ्यांच्या क्षेत्राची पडताळणी करण्यात आली होती.या तपासणी पथकामध्ये कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचा समावेश होता.पथकांमार्फत बीड, जालना,अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना व सांगली या जिल्ह्यांमध्ये तपासणी करण्यात आली होती.सदरील मोहिमेत एकुण ३६१ फळबागांची तपासणी करण्यात आली होती.या तपासणी मध्ये फक्त १४८ ठिकाणीच योग्य फळबागा आढळून आल्या होत्या.

**बीड जिल्ह्यात ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस**

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृगबहार सण २०२४ मध्ये विमा भरलेल्या बीड जिल्ह्यातील ३४२३ अर्जदारांच्या क्षेत्रावर जाऊन तपासणी केली जात आहे. तपासणी दरम्यान आतापर्यंत ७२५ ठिकाणी फळबागा नसणे, अधिकचे क्षेत्र दाखवणे, झाडे लहान असणे अशी प्रकरणे समोर आली आहेत. ही सर्व बोगस प्रकरणे विमा कंपनीने रद्द करावी अशी सूचना जिल्हास्तरीय समितीने संबंधित विमा कंपन्यांना केली आहे. अद्याप ७०टक्के तपासणी झाली असून १०० तपासणी झालेली नाही. पुढील कालावधीत विमा काढलेल्या प्रत्येक ठिकाणी जाऊन तपासणी केली जाणार आहे सर्व तपासणी झाल्यानंतर हा अहवाल पुढे कृषी आयुक्तालयास पाठविण्यात येणार आहे .

**आष्टी तालुक्यातील फळबागांची तपासणी अहवाल**

आष्टी तालुक्यातील केरूळ, कडा, धामणगाव, बिरंगुळवाडी या गावातील ४० ठिकाणी प्रतिनिधिक स्वरूपात फळबाग पीक तपासणी केली असता १८ योग्य अर्ज आढळले होते. ३ ठिकाणी फळपीक बाग आढळली नाही. प्रत्यक्षात लागवड क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र विमा घेतलेल्या अर्जांची संख्या १६ तर तपासणी वेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या उत्पादनक्षम वयापेक्षा कमी वय आढळलेल्या अर्जांची संख्या ०३ आढळली होती.त्यानंतर जिल्हा तपासणी सुरू झाली.

# अल्फलाह कमिटीच्या वतीने २५ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा संपन्न

माजलगाव ।सुनिल थोरात

माजलगाव शहरामध्ये मागील अकरा वर्षापासून अल्फला कमिटीच्या वतीने मुस्लिम समाजातील सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असून यावर्षी देखील दिनांक १९.१.२०२५ रविवार रोजी २५ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला त्याच बरोबर अल्पला कमिटीच्या वतीने शहरांमध्ये दोन ते तीन पानपोई सुरू असून सर्व जाती धर्मातील शंभर गरजवंत कुटुंबांना प्रत्येक महिन्याला किराणा किटचे वाटप करण्यात येते व अपघातातील रुग्णासाठी सहा बेडची मोफत सेवा, व कोरोना काळातील दोन हजार लोकांना किराणा किटचे वाटप करण्यात आले होते व सामाजिक काम करणाऱ्यांना दरवर्षी समाजसेवा पुरस्काराने गौरविण्यात येते यावर्षी या सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये डॉक्टर, अन्वर आशरफ पटेल, व बाळू ताकट यांना समाजसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले व प्रमुख पाहुणे म्हणून मौलाना साकिब यांनी मार्गदर्शन केले. व अल्ला ईश्वर यांना प्रार्थना करून आपले जीवन सुखी जगा, लग्नानंतर पती-पत्नीमध्ये सुखी संसार चालवा यावर त्यांनी मार्गदर्शन केले व अल्फाला कमिटीचे अध्यक्ष शेख इनायत, अली शेख, मुस्ताक शेख, राजू खान व अल्फला कमिटीचे सदस्य यांनी परिश्रम घेतले व अकरा वर्षापासून होत असलेल्या या कमिटीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# उपमुख्यमंत्री अजित पवार बीडमध्ये येताच सर्वात मोठी घडामोड

## उपमुख्यमंत्री अजित पवार बीडमध्ये येताच सर्वात मोठी घडामोड, १३ सरपंच आणि ४१८ ग्रामपंचायत सदस्यांचं सदस्यत्त्व रद्द

बीड । प्रतिनिधी

परळी पॅटर्न, पीक विमा, हार्वेस्टर घोटाळ्यानंतर आता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जात वैधता पत्र सादर न करणाऱ्या सरपंच आणि ग्राम पंचायत सदस्य यांच्या निवडी रद्द केल्या आहेत.निवडी रद्द केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.यापुढे नवे पालकमंत्री अजित पवार आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यापेक्षा कठोर निर्णय घेण्याची शक्यता आहे.विशेष म्हणजे सोमवारी रात्री उशिरा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडला उशिरा धावती भेट दिली आहे.

**सरपंचांसह सदस्यांना मोठा दणका**

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील १३ सरपंच तर ४१८ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहेत. जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिले आहेत. या आदेशाने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील ४१३ ग्रामपंचायत सदस्य आणि १३ सरपंचाचे सदस्य रद्द केले आहे.



**मुदत उलटूनही जात प्रमाणपत्र सादर नाही**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठीच्या राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र निवडून आलेल्या दिनांका पासून बारा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. मात्र २०२० पासून पुढे झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या अनेक सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. परिणामी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील ४१३ ग्रामपंचायत सदस्य आणि १३ सरपंचाचे सदस्य रद्द केले आहे..

### ३२ जात वैधता समितींना अध्यक्षाची प्रतिक्षा


दरम्यान राज्यातील जात वैधता प्रमाणपत्र समित्या या विना अध्यक्षच गाडा हाकत असल्याचे समोर येत आहे. राज्यातील ३२ जात वैधता प्रमाणपत्र समितींना अध्यक्षचं नसल्याचा आरोप काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी केला आहे. राज्यात केवळ ४ समित्यांवरच अध्यक्ष असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे जखम डोक्याला आणि इलाज पायाला अशी अवस्था असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तर दुसरीकडे अनेक सरपंच हे या निर्णयाविरोधात हायकोर्टात धाव घेण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

# बीड नगर परिषदेला रूपाली देशपांडे यांनी दिल संक्रांतीचं अनोखं वाण

## शहर स्वच्छतेसाठी खराटे आणि टोपले भेट

बीड । प्रतिनिधी

शहर स्वच्छतेसाठी लेखिका रूपाली देशपांडे यांनी बीड नगर परिषदेला संक्रांतीची भेट म्हणून खराटे आणि टोपले वाण दिले. बीड नगर परिषद परिसरात याची जोरदार चर्चा होत आहे. याविषयी बोलताना रूपाली देशपांडे म्हणाल्या की, सध्या बीड शहराची अवस्था ही अक्षरशः एखाद्या उकिरड्यासारखी झालेली आहे. संपूर्ण शहरात कुठेही जाऊन पाहिलं असता जिथे तिथे जागोजागी घाणच घाण, कचराच कचरा, गलिच्छता दिसून येत आहे. मग कोणा कोपरा असो की मुख्य रस्ते, सगळीकडे घाण आणि कचरा दिसत आहे. मोठे नाले असो की लहान नाल्या त्याही अगदी तुडुंब भरलेल्या दिसतात. चार-सहा महिन्यांतून लहान नाल्या साफ केल्यातर नालीतून काढलेली घाण आठ-आठ, दहा-दहा दिवस उचलली जात नाही. ती तशीच रस्त्यांवर पडून राहते. मोठे नाले तर वर्षानुवर्षे काढले जात नाही. ही अवस्था पाहता बीड नगर परिषदेत स्वच्छता विभाग अस्तित्वात आहे की नाही? शहर स्वच्छतेसाठी आवश्यक संख्येत मनुष्यबळ आहे की नाही? स्वच्छते करिता लागणारी यंत्रसामग्री आहे की नाही? असे अनेक प्रश्न आम्हा बीड शहरवासीयांच्या मनात उत्पन्न होतात. बीड नगर परिषदेकडे मनुष्यबळ कमी असेल तर तो बीड शहराचे नागरिक म्हणून आम्ही वाढवू तर शकत नाही परंतु आमच्याकडून बीड नगर परिषदेला काही सामग्री देऊ शकतो. म्हणून सक्रांती सणाच्या निमित्ताने वाण म्हणून स्वच्छतेकरिता लागणारे खराटे आणि टोपले सप्रेम भेट म्हणून दिले आहे. प्रत्यक्षात मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांना भेटूनच द्यायचे होते. याकरिता गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्याशी संपर्क साधून भेट देण्याचे सांगत होते परंतु मॅडमची भेट काही होऊ शकली नाही म्हणून खराटे आणि टोपले बीड नगर परिषदेतील त्यांच्या कार्यालयाच्या दारात ठेवले असे मनोगत रूपाली देशपांडे यांनी बोलताना व्यक्त केले.





साई गुण गौरव राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त विजेते कडा येथील सामाजिक कार्यकर्ते दीपक भैया गरुड यांना मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना गणेश नाना शिंदे, सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे ,कडा शहराचे माजी सरपंच अनिल तात्या ढोबळे ,कडा ग्रामपंचायत सदस्य बिपिन शेठ भंडारी ग्रामपंचायत सदस्य योगेश शेठ भंडारी , ग्रामपंचायत सदस्य संजय नाना ढोबळे, पत्रकार संजय खंडागळे, पत्रकार संदीप जाधव अदि छायाचित्र (सुरेश कांबळे आष्टी )



मुंबई आनुशाली नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार सना मालिक व त्यांचे पति मोइनोद्दीन साहब बीड ला आले असताना त्यांचे सत्कार हफीज मन्सूर साहब शेख इकबाल साहब यांच्या हस्ते करण्यात आले .व ईतर मित्र परिवार उपस्थित होता. छायाचित्रकार शेख जमीर

# चला देशाचे उज्वल भविष्य घडवू आणि विद्यार्थ्यांना आधार देऊ- दिपक मधुकर माने

माजलगाव । सुनिल थोरात

तालुक्यातील वाघोरा येथील अल्प भूधारक असणारे व पोटाची खळगी भागवण्यासाठी आई-वडिलांसह गाव सोडून पुणे येथे स्थित असणारे तसेच उच्च शिक्षण प्राप्त केलेले दीपक माने हे बालपणापासून चाणाक्ष बुद्धी, जिद्द आणि शिक्षणाच्या जोरावर उच्चशिक्षित झाले. बालवयापासून त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव असल्याने आपणही समाजाचे काहीतरी देणे आहोत. आणि आपणही आपल्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी काहीतरी केले पाहिजे हाच मनोदय उराशि बाळगत त्यांनी २६ जानेवारी निमित्त सुलतानपूर ( माळेवाडी ), गोविंदवाडी, किट्टी आडगाव या भागातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी १५०० स्कूल बॅग व कॉम्प्युटर सेट चे वाटप करण्याचा संकल्प केला आहे.



मूळचे वाघोरा येथे रहिवासी असणारे दीपक माने यांना कुठलीही राजकीय अथवा सामाजिक पार्श्वभूमी नसून आपण समाजाचे काहीतरी देणे आहोत. आपणही समाजासाठी काहीतरी केले पाहिजे या भावनेतून आपणही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहोत. समाजातील गोरगरीब होतकरू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून काहीतरी केले पाहिजे या अनुषंगाने जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्वच समाजातील गोरगरीब व अति दुर्बललागतील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे तसेच कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये. हाच मनोदय उराशी बाळगत २३ जानेवारी२०२५जि प प्राथमिक शाळा सुलतानपुर येथे स्कूल बॅग चे वाटप होणार आहे वेळ सकाळी ठिक ११ वाजता ठेवला आहे परिसरातील शिक्षण प्रेमी नागरिकांनी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहावे तरी रोजी चला, देशाचे भवितव्य घडवूया, विद्यार्थ्यांना आधार देऊ या संकल्पनेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुलतानपुर ( माळेवाडी ) गोविंद वाडी, किट्टी आडगाव येथील शाळेतील १५०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग तसेच गरजु विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सेटचे वाटप दीपक मधुकर माने यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

# आदर्श सरपंच अमोल जगताप यांना दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण व परेडसाठी विशेष अतिथी म्हणून निमंत्रण

धारूर / प्रतिनिधी

तालुक्या जिल्हा सह राज्यभरात उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या ग्रामपंचायत चे नाव उच्च स्थानी ठेवणारे धारूर तालुक्यातील आदर्श आवरगावचे आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांना देशाच्या सर्वोच्च ठिकाणी सर्वोच्च कार्यक्रमास दिल्ली येथे विषेश आतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे हे निमंत्रण परिवारासह आहे व भारताचा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२५ रोजी च्या परेडमध्ये उपस्थित राहण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले आहे.त्यात बीड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतचे प्रतिनिधित्व अमोल जगताप हे दिल्ली येथे करणार आहेत त्याबद्दल सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र राज्यातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३४ ग्रामपंचायत सरपंचांना व त्यांच्या परिवाराला हे विशेष निमंत्रण देण्यात आले आहे ,केंद्र शासनाच्या सुचनांनुसार निवड ३४ ग्रामपंचायत च्या सरपंचांनी निवड करून संचालक पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास सादर केली आहेत. सदर ३४ व्यक्तींची यादी सुद्धा संबंधित जिल्हा परिषद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवण्यात आलेली आहे, तसेच सदर व्यक्तींचा प्रवास खर्च शासकीय नियमानुसर अनुज्ञेय असल्याने तो राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत एक्स्पोजर व्हिजिट घटकांतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येणार आहे. याबद्दलही महाराष्ट्रातील ३४ ग्रामपंचायतीचे सरपंचांचे अभिनंदन होत आहे.

भारत सरकारकडून दिल्ली या ठिकाणी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण व परेड कार्यक्रमास महाराष्ट्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मला विषेश आतिथी म्हणून आमंत्रित केले आहे, हे निमंत्रणच आमचा खरा सन्मान आहे हा सन्मान पुढील काळात पुढील कार्यास मला प्रोत्साहन देत राहील. या कार्यक्रमास विषेश आतिथी म्हणून मला सपत्नीक निमंत्रित केल्या बद्दल मी शासनाचा आभारी आहे.

– श्री.अमोल सर्जेराव जगताप
(आदर्श सरपंच,ग्रामपंचायत आवरगाव ता.धारूर जि. बीड)



# रॉयलस्टार संघ ठरला विजेता, तर डी.डी. संघ उपविजेता

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई : गेवराई येथे बुधवार १ जानेवारी पासुन सुरु असलेल्या जयभवानी चषक क्रिकेट स्पर्धेतील अंतीम सामन्यात विजय मिळवत रॉयलस्टार संघाने जयभवानी चषक जिंकला. तर डी.डी. संघ हा उपिवजेता ठरला. गेवराई येथील भगवती क्रिकेट क्लबच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेता व उपविजेत्या संघास रविवार (१९ जानेवारी) रोजी दुपारी २ वाजता शिवराज पवार यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. रॉयलस्टार क्रिकेट संघाने जयभवानी चषक पटकावला या प्रसंगी संघातील खेळाडू बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमासाठी शिनु बेद्रे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, विलास गुंजाळ, सालम चाऊस, विनायक गिरी, समाधान मस्के, पिटु साळवे. दिपक मुद्दशीर, शेख काबंळे, कृष्णा अवघड, शेख नसिर, रजित पाटोळे, बालाजी जाधव, वाजेदान, शेख बाबा, राजेंद्र ताडिया, प्रदीप सुतार, आकाश सुतार, अशोक नाडे विजेता रॉयल स्टार संघांचे खेळाडू,शेख शाहेद,शम्मु मनियार,नईम बागवान,फैसल चाऊस,अतीक अतार,सय्यद अदीब

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारूर कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्ष पदी बालाजी प्रकाश शिनगारे तर सचिव पदी मनोज दादा जगताप



**धारूर / प्रतिनिधि**

**स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुरची बैठक १८ जानेवारी रोजी संपन्न झाली. यावेळी अध्यक्षपदी बालाजी शिनगारे उपाध्यक्षपदी प्रताप शिनगारे तर सचिवपदी मनोज जगताप यांची निवड करण्यात आली.**

**किल्ले धारुर शहरात स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून व त्याच्यानंतर सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३६ वर्षपासुन छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटामाटात उत्सहात साजरी करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर वतीने शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे त्या अनुषंगाने १८ जानेवारी वार शनिवार रोजी सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर अध्यक्ष पदी बालाजी प्रकाश शिनगारे,उपाअध्यक्ष पदी प्रताप भाऊ शिनगारे,सचिव पदी मनोज दादा जगताप,सहसचिव पदी संकेत शिनगारे,कोषाध्यक्ष पदी आण्णासाहेब गोन्ने,सहकोषाध्यक्ष पदी जीवन पुजदेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मिरवणुक प्रमुखपदी नागेश भाऊ शिनगारे,श्रीनिवास शिनगारे,भागवत लांडगे,प्रशांत बापु शिनगारे,विश्वास शिनगारे,अशोक जगताप,अमोल शिनगारे,बालाजी शिनगारे,पत्रकार हरिभाऊ मोरे,गणेश फुन्ने,प्रशांत शिनगारे,अमरजित शिनगारे,अजित शिनगारे, बाळासाहेब शिनगारे,महेश साखरे,अशोक शिनगारे,धनंजय शिनगारे,आविनाश साखरे,विजय शेळके यांनी निवड करण्यात आली. यावेळी निलेश शिनगारे,आकाश शिनगारे, पवन शिनगारे,दत्ता धुमरे,यांच्यासह असंख्य शिवप्रेमी शिवभक्त उपस्थित होते.






माजलगाव (प्रतिनिधी)

लिमगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवा नेते तथा आमदार विजयसिंह पंडित यांचे कट्टर समर्थक मा. मोहन शिंदे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा. या उपक्रमाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला मोहन शिंदे हे नेहमीच तालखेड सर्कल मधील सक्रिय कार्यकर्ते आहेत ते नेहमी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करत आहेत गोरगरीब सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी नेहमीच मोहन शिंदे यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे मोहन शिंदे यांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो मात्र यावेळी सामाजिक भान जपत त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवत आपला वाढदिवस साजरा केला यावेळेस सर्व ग्रामस्थ सर्व शिक्षक वृंद यांनी मोहन शिंदे यांना येणाऱ्या भावी आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या

# मिलिंद माध्यमिक विद्यालयात क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

**क्रिडा स्पर्धांमधून स्नेहभाव वृद्धिंगत होतो – प्रा.अतुल दुबे**

परळी (प्रतिनिधी)

येथील नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून व सहसचिव प्रदीपजी खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'स्व.पंडित अण्णा मुंडे क्रीडा महोत्सवाचे' शानदार उद्घाटन समारंभ प्रसंगी नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक प्राचार्य श्री.अतुल दुबे सर विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करत असताना म्हणाले क्रिडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बना.आजचा विद्यार्थी मैदानापासून दूर चालला आहे. विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून सुध्दा बघितले पाहिजे. खेळामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडते. यश-अपयश पचवण्याची ताकत मैदानी खेळ खेळल्यावरच विद्यार्थ्यांमध्ये येते. सर्वात महोत्वाचे म्हणजे खेळांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांचा आपसातील 'स्नेहभाव वृद्धिंगत होतो.'




नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित ना. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून व सहसचिव प्रदिप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्व.पंडित आण्णा मुंडे क्रिडा महोत्सव मिलिंद माध्यमिक विद्यालयात सुरू केला असून भविष्यात तालुका व जिल्हास्तरा पर्यंत आयोजित केला जाईल असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक श्री.अतुल दुबे यांनी या उद्घाटन समारंभ प्रसंगी केले.

दि.२० जानेवारी ते २५ जानेवारी २०२५ पर्यंत चालणाऱ्या या क्रिडा महोत्सवात मिलिंद माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मधील खेळाळूंनी सहभाग नोंदवला आहे. लांब उडी, उंच उडी, १००, २००,४०० मिटर धावणे, कबड्डी, खो-खो, क्रिकेट अशा विविध मैदानी स्पर्धेत अंतरवर्गीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोदवला आहे.या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक तथा यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.अतुलजी दुबे सर, मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य श्री.किरण शिंदे सर,शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर, पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय ना .श्री.धनंजयजी मुंडे साहेब, सहसचिव माननीय श्री.प्रदीपजी खाडे साहेब


# अजित पवारांच्या बीडच्या पालकमंत्रिपदास विरोध

## जालन्यात दादांना दाखवले काळे झेंडे

**प्रतिनिधी** । जालना

मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीडचे पालकत्व देण्यास कडाडून विरोध दर्शवला आहे. त्यांनी या प्रकरणी सोमवारी जालन्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या अजित पवारांना काळे झेंडे दाखवून आपला रोष व्यक्त केला. अजित पवार सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांना पाठिशी घालत असल्याचा आरोप या संघटनेने केला आहे.

बीड जिल्हा सध्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे चांगलाच चर्चेत आला आहे. येथील सर्वपक्षीय नेत्यांनी बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे यांना देण्यास तीव्र विरोध केला. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्याचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवले. यामुळे सर्वकाही ठिकठाक झाल्याचे चित्र असतानाच भारतीय मराठा महासंघाने अजित पवार यांच्या पालकमंत्रीपदाला कडाडून विरोध दर्शवला आहे. अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारून एकप्रकारे ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत, असा आरोप त्यांनी केला आहे.



### काय म्हणाले आंदोलक?

- संतोष देशमुख हत्या प्रकरणी चौफेर आरोप होणारे मंत्री धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या पक्षाचे आहेत. या खून प्रकरणाचा तपास कोणत्याही राजकीय दबावाशिवाय होण्यासाठी बीडचे पालकमंत्रीपद हे दुसऱ्या पक्षाच्या नेत्याकडे देण्याची गरज होती. पण अजित पवारांनी स्वतः हे पद स्वीकारल्यामुळे एका अर्थाने ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध केला,

अजित पवार यांचा ताफा शहरातील भोकरदन नाका येथून जाणार होता. त्यांचा ताफा या ठिकाणी पोहोचताच अचानक ४-५ आंदोलक त्यांच्या ताफ्यापुढे आले. त्यांनी काळे झेंडे दाखवून अजित पवारांचा निषेध केला. या अनपेक्षित घटनेमुळे तिथे बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांची एकच तारांबळ उडाली. त्यांनी आंदोलकांना रोखून धरण्याचा प्रयत्न करत अजित पवारांच्या ताफ्याला मार्ग करून दिला. अवघ्या काही मिनिटांच्या या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT